www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 358   शनिवार दि. 13 सप्टेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

# भारतात लवकरच अत्याधुनिक अल्ट्रा ड्रोन!

## भारत फोर्जची ब्रिटनमधील विंडरेसर्स कंपनीशी भागीदारी

**पुणे** : भारतात अत्याधुनिक 'अल्ट्रा ड्रोन' सादर करण्यासाठी भारत फोर्ज लिमिटेडने (बीएफएल) ब्रिटनमधील विंडरेसर्स कंपनीशी परस्पर सामंजस्य करार केला आहे. ही अल्ट्रा ड्रोन जड भार वाहू शकणारी आणि दुहेरी वापरण्यायोग्य अत्याधुनिक स्वरूपाची आहेत. त्यांचा वापर भविष्यात भारतीय संरक्षण दलासाठी होऊ शकणार आहे. विंडरेसर्स कंपनीकडून विंडरेसर्स अल्ट्रा या ड्रोनची (यूएव्ही) निर्मिती केली जाते. आता ही ड्रोन भारतात सादर करण्यात येणार आहेत. या ड्रोनसाठी कार्यक्षेत्र निश्चित करणे, स्थानिक दृष्टिकोनातून त्यात बदल करणे आणि त्यांचा प्रत्यक्षात वापर यासाठी हा करार करण्यात आला. लंडन येथे झालेल्या 'डीएसईआय यूके २०२५' या प्रदर्शनात या करारावर शिक्कामोर्तब झाले. भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार करारान्वये दोन्ही देशांमध्ये एअरोस्पेस क्षेत्रातील तंत्रज्ञान हस्तांतर व नावीन्य वाढविण्याच्या हेतूने ही भागीदारी करण्यात आली आहे.




भारत फोर्ज आणि विंडरेसर्स यांच्यातील करार दोन वर्षांच्या कालावधीसाठीचा असून, त्या अंतर्गत स्थानिक पातळीवर ड्रोनचा वापर वाढविणे, संयुक्त चाचण्या घेणे आणि त्यांची भारतातील प्रत्यक्ष तैनातीसाठी अंतिम रूपरेषा तयार करण्याचे काम या भागीदारीतून होईल. 'अल्ट्रा' ड्रोनच्या क्षमतांचा वापर करून भारताच्या संरक्षण आणि नागरी क्षेत्रातील नव्या गरजा पूर्ण करण्याचा भारत फोर्ज आणि विंडरेसर्स यांचा मानस आहे.

भारतीय नौदलासाठी कॅरिअर ऑन बोर्ड डिलिव्हरी (सीओडी) मोहिमा, लष्कर व हवाई दलासाठी अत्यावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याची व्यवस्था आणि आपत्कालीन प्रसंगी इतर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या 'अल्ट्रा'च्या साहाय्याने पार पाडता येतील, असा विश्वास या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

याबाबत 'भारत फोर्ज'चे सहव्यवस्थापकीय संचालक अमित कल्याणी म्हणाले, 'अल्ट्रा ड्रोन ही नौदल, हवाई दल आणि लष्कर या तिन्ही सैन्य दलांच्या गरजांसाठी उपयुक्त आहेत. या तंत्रज्ञानाच्या मदतीने आम्हाला तिन्ही सैन्य दलांना सेवा उपलब्ध करून देता येईल. नौदल मोहिमा, उंचावरील पुरवठा साखळी व दुहेरी उपयोगाचे तंत्रज्ञान यांना संरक्षण दलांकडून प्राधान्य देण्यात येत आहे.'

**विंडरेसर्स अल्ट्रा ड्रोन**

विंडरेसर्स अल्ट्रा ड्रोनमध्ये अत्याधुनिक मिशन कंट्रोल व ऑटोपायलट प्रणालीचा वापर करण्यात आला असून, सलग सहा ते सात तासांच्या दीर्घ मोहिमांसाठी त्याची रचना केलेली आहे. भारतात समुद्री व बेटांवरील प्रदेशांपासून हिमालयातील उंच डोंगराळ भागापर्यंत आणि ईशान्य भारतातील दुर्गम क्षेत्रांपर्यंत विविध वातावरणात कार्यक्षमतेने काम करण्यासाठी त्याची निर्मिती करण्यात आली आहे.

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचा २०२५ साखरचौथ गणेशोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**तळे प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व विद्याशाखेच्या वतीने आयोजित साखरचौथ गणपती उत्सव २०२५ अतिशय दिमाखदार व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गणपती बाप्पाच्या आगमनावेळी टाळ व मृदुंगाच्या गजरात भाविकांनी गणेशमूर्तीचे स्वागत केले. विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित राहून या उत्सवाची शोभा वाढवली.

या गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरा यांचा उत्तम संगम पाहायला मिळाला. भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मंडळाचा हा उत्सव परिसरातील सर्वांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरला.



मंगळवार दिनांक ९ सप्टेंबर रोजी गणपतीची आगमन मिरवणूक काढण्यात आली. बुधवार दिनांक १० सप्टेंबर रोजी गो म वेदक विद्यामंदिर तळाचे सहाय्यक शिक्षक श्री व सौ संगीता सुहास भोईर यांच्या हस्ते सकाळी ९ वा गणपतीची विधिवत पूजा व आरती करण्यात आली. सकाळी ११ वा श्लोक व स्तोत्र पठण स्पर्धा पार पडल्या. दुपारी १२.३० वा सामूहिक आरती करण्यात आली. दुपारी २.३० वा श्री सुहास भोईर व विद्यार्थ्यांनी भजन सादर केले. दुपारी ४ वा सांस्कृतिक कार्यक्रम, सायंकाळी ६.३० वा सर्व विद्याशाखा कर्मचारी व विद्यार्थ्यांचे फनी गेम्स व संगीत खुर्ची, रात्री १० वा सर्व विद्याशाखा कर्मचारी, विद्यार्थी व भोईरवाडी मंडळाचे भजन, गुरुवार दिनांक ११ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वा मुख्याध्यापक श्री दिलीप ढाकणे यांच्या हस्ते विधिवत पूजा, ९.३० वा कॅरम व बुद्धिबळ, सकाळी ११ वा सर्व विद्याशाखा कर्मचारी व विद्यार्थ्यांचे कविता वाचन, अभंग गायन, अभिनय सादरीकरण, दुपारी १२.३० वा गणपतींची आरती, दुपारी १ वा महाप्रसाद, दुपारी २ वा उत्तरपूजा व दुपारी ३ वा गणपतीची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

दरम्यान तळा पोलीस ठाणेचे पोलीस बांधव तैनात करण्यात आले होते. या उत्सवादरम्यान संस्था पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, तळा परिसरातील नागरिक, सामाजिक व राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी गणपतीचे दर्शन घेतले. क्रीडा, श्लोक, चित्रकला आदी स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, सचिव मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब यादव, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, डॉ भगवान लोखंडे, डॉ दत्ता कुंटेवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सचिन भाटे आदी मान्यवर उपस्थित होते. हा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# वाहत्या गटारावर टाकलेले दगड माती काढणार केव्हा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

खार पुर्व, जवाहर नगर, भवानी बॅक परिसरातील HE विभाग महामहानगर पालिका वॉर्ड क्र ९४ च्या हद्दीतील हुसेन टेकडी मार्ग सांताक्रूझ व वांद्रे दिशेला जाणार मार्ग संत ज्ञानेश्वर मार्ग (पाईप लाईन रोड) च्या शिवालिक वेंचर बिल्डिंगच्या गेट समोरील एप्रिल महिन्यापासून गटार दुरुस्ती च्या नावाखाली खोदकाम करुन ठेवलेले काम अर्धवट अवस्थेत आहे. खोदकाम केलेले कामाच्या खाली खार पुर्व जवाहर नगर वस्तीतील मुख्य गटार लाईन आहे. हि गटार लाईन खार रेल्वे स्थानक ते लाल मैदान, वाघावाडी, धोबीघाट, शिवशंभू, ओमभारत, साईबाबा रोड करत सर्व पाण्याचा प्रवाह या गटारातून मिठा नदीला जाऊन मिळत आहे. सद्या हे अर्धवट करुन ठेवले आहे. या अर्धवट कामामुळे सर्व मातीचा ढिगारा गटाराच्या प्रवाहात साचून ठेवला आहे. या पावसाळ्यामुळे पाण्याचा प्रवाह व्यवस्थित झाला नाही. त्यामुळे विभागातील नागरिकांच्या घरादारात पाणी पाणी साचलेले होते. सद्या हे कॉन्ट्रॅक्टरनी अर्धवट सोडून पळाला आहे. त्याचबरोबर गटाराच्या अवतीभवती कचरा, गोण्याचा ढिगारा, पडिक मोटारसायकल, MTNL चा पडलेला बॉक्स यांनी हा सर्व परिसर व्यापून गेला आहे. गटारी लाईन दिसण्यात येत नाही. या अडचणी व समस्याकडे स्थानिक लोक प्रतिनिधी व महानगरपालिका अधिकारी लक्ष देत का नाही. तेव्हा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने त्वरित आपलं लक्ष देऊन या गटाला तील गाळ व मातीचा ढिगारा साफ करून तो पूर्वापार व्यवस्थित करुन द्यावा अशी आपणास नागरिकांच्या वतीने विनंती करण्यात येते आहे.



# दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे महाराष्ट्र व मुंबई विभागात महत्वाच्या नियुक्त्या

**दैनिक युवक आधार**
**राकेश पाटील मुंबई प्रतिनिधी**

मुंबई – दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे राज्य व मुंबई विभागासाठी नुकत्याच दोन महत्वाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

श्री. संतोष शिवदास आमले यांची "Head of Maharashtra State – Digital & Print Media" या मानाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे, तर श्री. किशोर रमाकांत गुडेकर यांची "Head of Mumbai Suburb – Digital & Print Media" या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्त्यांमुळे महाराष्ट्र व मुंबई विभागातील डिजिटल व प्रिंट मीडिया क्षेत्रातील कार्य अधिक व्यापक व प्रभावी होईल, असा विश्वास युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अजित म्हामुणकर यांनी व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, "दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही संस्था केवळ कलाकार व तंत्रज्ञ यांच्या हक्कांसाठीच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक चळवळींमध्येही सक्रिय आहे. मीडिया विभागातील या दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या युनियनच्या कार्याला नवा वेग देणार आहेत."






श्री. संतोष शिवदास आमले हे दीर्घकाळापासून पत्रकारिता व माध्यम क्षेत्रात कार्यरत असून, सामाजिक व सांस्कृतिक चळवळींमध्येही त्यांचे योगदान लक्षणीय आहे. महाराष्ट्रभरातील संघटनेच्या कार्याचा प्रचार-प्रसार करण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

तर श्री. किशोर रमाकांत गुडेकर हे सामाजिक कार्य, संघटनात्मक बांधिलकी आणि माध्यमांशी जवळीक यासाठी ओळखले जातात. मुंबई उपनगर विभागातील युनियनच्या कार्याचा डिजिटल व प्रिंट माध्यमातून अधिक प्रभावी प्रसार करणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

या मानाच्या नियुक्त्यांबद्दल श्री. आमले व श्री. गुडेकर यांचे सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत असून, युनियनचे इतर पदाधिकारी व सदस्यांनीदेखील समाधान व्यक्त केले आहे.

"या दोन्ही नेमणुकांमुळे संघटनेच्या माध्यम विभागाला नवा आयाम मिळेल आणि महाराष्ट्रात चित्रपटसृष्टीशी संबंधित घडामोडींचे प्रतिबिंब जनतेपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचेल" असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

# दादासाहेब फाळके चित्रपट युनियन मीडिया विभागाच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी संतोष शिवदास आमले यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**विलास गायकवाड उपसंपादक**

दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष अजित म्हामुणकर यांनी मीडिया क्षेत्रातील केलेल्या कामाची दखल घेऊन मीडिया विभागाच्या महाराष्ट्र राज्याध्यक्षपदी पनवेलचे रहिवासी व दैनिक युवक आधारचे संपादक श्री. संतोष शिवदास आमले यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सिनेसृष्टीत तसेच सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे.



**सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सक्रिय**

संतोष आमले हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक उपक्रम, कला व सांस्कृतिक चळवळींमध्ये अग्रेसर आहेत. विविध संस्थांमार्फत त्यांनी युवकांना प्रोत्साहन दिले असून पत्रकारिता आणि समाजकारण क्षेत्रात त्यांचे वेगळे स्थान निर्माण झाले आहे.

**- दिग्दर्शक व अभिनेता विकास वायाळ**

कलाकार दिग्दर्शक यांच्याशी चांगला संपर्क असून सामाजिक क्षेत्र व पत्रकार क्षेत्रामध्ये दैनिक युवक आधार च्या माध्यमातून आमले यांची वेगळी ओळख निर्माण झाली असून मीडिया क्षेत्रात संघटनेच काम वाढवण्यास मदत होईल.

**आमले यांची भूमिका**

आपल्या निवडीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री. आमले म्हणाले, "दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या मीडिया विभागाचे महाराष्ट्र राज्याध्यक्षपद मिळणे ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. चित्रपटसृष्टीतील कामगार, कलाकार, तंत्रज्ञ तसेच पत्रकार यांना न्याय, सुविधा आणि योग्य मान-सन्मान मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. महाराष्ट्रातील सिनेसृष्टीचा गौरव वाढवणे हेच माझे ध्येय असेल."

या नियुक्तीबद्दल श्री. आमले यांचे विविध मान्यवर, पत्रकार, कलाकार व सामाजिक कार्यकर्त्यांकडून हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या कार्यकाळात मीडिया विभाग अधिक गतिमान होईल आणि दादासाहेब फाळके यांचे नाव उज्ज्वल ठेवणाऱ्या चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत मोलाची भर पडेल, असा विश्वास आहे

**-अजित म्हामुणकर अध्यक्ष दादासाहेब फाळके चित्रपट युनियन**

युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "मीडिया विभाग हा चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ आणि पत्रकार यांच्यातील दुवा मानला जातो. श्री. आमले यांच्या नेतृत्वाखाली हा विभाग अधिक सक्षम होईल आणि महाराष्ट्रभरातील माध्यम प्रतिनिधींना योग्य व्यासपीठ उपलब्ध होईल, असा आम्हाला विश्वास आहे."



**दैनिक युवक आधार** - पाटोदा- मांजरसुंबा रोड वरील भारत सॉ मिल चे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ(MIDC), शंभर चिरा रोड पाटोदा या ठिकाणी नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले. या प्रसंगी शुभारंभानिमित्त उपस्थित राहुन शेख खुद्दुस भाई यांना शुभेच्छा देताना. अँड. जब्बार पठाण, शेख जहीर भाई, सफदर मामु, पत्रकार शेख महेशर सह इतर

**(छाया- दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# सिडको विस्थापित गावांना मिळाली जुनी ओळख; गावांची नावे पूर्ववत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांना आता त्यांची जुनी ओळख परत मिळाली आहे. सिडकोने या गावांना आर-१, आर-२, आर-३, अशी नवीन नावे दिली होती, ज्यामुळे त्यांची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख पुसली जात होती. यामुळे, गावातील रहिवाशांनी आपली जुनी ओळख कायम ठेवण्यासाठी दहा गाव समिती आणि ग्रामस्थांच्या माध्यमातून पाठपुरावा केला आणि या प्रयत्नांना आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ दिले आणि अखेरीस सिडकोने गावांना त्यांची जुनी नावे परत देण्याचा निर्णय घेतला आहे.

आज आमच्या गावाचं पुनर्वसन होऊनसुद्धा त्याला मूळ नावानेच ओळख मिळाली, हे आमच्यासाठी अभिमानाचं आणि आनंदाचा क्षण आहे. गावाचं नाव जसंच्या तसं जपलं गेलं म्हणजेच आमच्या परंपरेला, इतिहासाला आणि आत्मसन्मानाला सलाम करण्यात आला आहे. ही महत्त्वाची बाब शक्य झाली ती आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर साहेबांच्या प्रयत्नांमुळे. गावकऱ्यांच्या भावना ओळखून, प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून, प्रत्येक कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत कौतुकास्पद आहे. आज पुनर्वसित गावातील प्रत्येक नागरिकांच्या मनात समाधान आहे की, “घर नवं झालं, जागा नवी झाली, पण गावाचं नाव तेच राहिलं.” आमदार साहेबांनी दाखवलेला हा संवेदनशील दृष्टिकोन खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधीपणाचे उत्तम उदाहरण आहे. गावकऱ्यांच्या वतीने आम्ही आमदार साहेबांचे मनःपूर्वक आभार मानतो. - रुपेश धुमाळ, भाजप- अध्यक्ष पनवेल तालुका पश्चिम मंडळं

विमानतळबाधित गावांना ओळख मिळून देण्यासाठी दहा गाव समिती आणि आम्ही पाठपुरावा केला होता. त्याला आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी पाठबळ दिले. त्यामुळे आता आम्हाला आमची जुनी ओळख मिळणार आहे. यामुळे आमच्या भागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.
**- समीर मदन केणी, पंचायत समिती अध्यक्ष, वडघर विभाग भाजप**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे चिंचपाडा, कोल्ही, कोपर, वाघीवली वाडा, वरचे ओवळे, कोंबडभूजे, तरघर, गणेशपुरी आणि उलवे ही गावे विस्थापित झाली, पण त्यांच्या खरी ओळख जपण्याऐवजी सिडकोने त्यांना आर-१, आर-२, आर-३, आर-४, आर-५ अशी नवीन नावे दिली आणि गावांचा इतिहास व संस्कृती पुसून टाकली. या गावांना त्यांची जुनी ओळख कायम राहावी यासाठी दहा गाव समिती आणि ग्रामस्थांनी पाठपुरावा केला होता. त्याला आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ देऊन सिडकोने आता या गावांना जुनी ओळख कायम केली आहे. त्यानुसार आता जुन्या नावाची ओळख गावांना परत मिळाली असून सेक्टर आर-१ हे 'चिंचपाडा सेक्टर आर १', सेक्टर आर-२ हे 'चिंचपाडा सेक्टर आर २', सेक्टर आर-३ हे 'चिंचपाडा व कोल्ही सेक्टर आर ३', सेक्टर आर-४ हे 'कोपर सेक्टर आर ४', सेक्टर आर-५ हे 'वाघिवलीवाडा सेक्टर आर ५', सेक्टर १ हे 'वरचे ओवळे सेक्टर १', सेक्टर २४ हे 'उलवे सेक्टर २४', सेक्टर २५ हे 'तरघर व कोंबडभुजे सेक्टर २५', सेक्टर २५ ए हे 'कोंबडभुजे व गणेशपुरी सेक्टर २५', सेक्टर २६ हे वाघिवली सेक्टर २६, तर सेक्टर १३ हे 'डुंगी सेक्टर ३' या नावाने अर्थात जुन्या नावाने ओळखले जाणार आहे. सिडकोने पनवेल परिसरात होणाऱ्या विमानतळाच्या बांधणीसाठी चिंचपाडा, कोल्ही कोपर, पारगाव, ओवळे, कोंबडभुजे, उलवेसारख्या भागातील जमिनी संपादित केल्या जमिनी संपादित करताना त्यांना मोबदला म्हणून २२.५ टक्के प्रमाणे भूखंड देण्यात आले. नवी मुंबई विमानतळ उभारताना जी गावे विस्थापित आली आहेत त्यांना सिडकोने भूखंड देऊन तेथे इमारती उभ्या राहिल्या. गावाचे गावपण जाते की काय असा प्रश्न तेव्हा अनेकांना पडू लागला. भूखंडावर इमारती उभ्या राहिल्या. भूखंड सिडकोचे असल्याने त्यांना नावेही सिडकोने दिली. मात्र गावांची ओळख कायम रहावी यासाठी सिडकोकडे मागणी करण्यात आली आणि त्या मागणीला आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ दिले. या संदर्भात सिडकोने महत्वपूर्ण निर्णय घेत गावांना आता त्यांची जुनी ओळख कायम ठेवली आहे.

# ‘ई-पीक पाहणी’साठी केवळ तिन दिवस शिल्लक.

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक (राजु शिंदे.मंठा)**
मंठा शेतीच्या ई-पीक पाहणीच्या नोंदणीसाठी अवघे चार दिवस उरले आहेत. १५ सप्टेंबर ही नोंदणीची अंतिम मुदत असून, मंठा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी पिकांची ऑनलाइन नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन मंठा तहसीलदार कल्याण काळदाते यांनी केले आहे.




ही नोंदणी न केल्यास शासनाच्या अनेक योजनांच्या लाभापासून शेतकरी वंचित राहू शकतात. यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
डिजिटल ई-पीक पाहणी सर्व्हे अंतर्गत, प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या शेतातील पिकांची अचूक माहिती स्वतःहून ऑनलाइन पद्धतीने नोंदवणे

**१५ सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणीसाठी मुदत**
अनिवार्य आहे. ही माहिती शासनाच्या विविध योजनांसाठी पायाभूत मानली जाते. जर शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी केली नाही, तर त्यांना खालील महत्त्वाच्या लाभांपासून वंचित राहावे लागू शकते. विविध शेतीपूरक योजनांसाठी मिळणारे अनुदान, महाडीबीटी पोर्टलवर योजनांसाठी अर्ज करतांना, नैसर्गिक आपत्तीतील नुकसान भरपाई, पीक विमा योजना यासाठी पीक पेरा नोंदणी आवश्यक आहे. सध्याच्या युगात तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे अधिक सोपे झाले आहे. हीच बाब लक्षात घेऊन शासनाने 'ई-पीक पाहणी' ॲप तयार केले आहे. हे ॲप कोणत्याही ॲँड्रॉइड मोबाइलवर डाउनलोड करता येते. माहिती मराठीत असल्यामुळे नोंदणी करणे सोपे झाले आहे. शेतकऱ्यानी नोंदणी करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी अद्याप ई-पीक पाहणीमध्ये नोंदणी केलेली नाही. ही चिंतेची बाब आहे. शेतकऱ्यांनी तत्काळ याकडे लक्ष द्यावे. शेतकऱ्यांनी १५ सप्टेंबरपूर्वी ही नोंदणी पूर्ण करून संभाव्य आर्थिक नुकसान टाळावे.
**कल्याण काळदाते, तहसीलदार, मंठा.**

# शेत जमीन खरेदी विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी असल्याचे खोटे दाखले जोडून दस्त नोंदणी !!.

**दैनिक युवक आधार**
**एम.डी.भोईर रायगड जिल्हा प्रतिनिधी प्रमुख**
उरण तालुक्यातील शेत जमिनीचे खरेदी विक्री होत असलेल्या दस्त नोंदनी,मुद्रांक




शुल्क राज्य सरकार वेळोवेळी कायदेशीर दस्त नोंद करण्यासाठी लागणारे मुद्रांक शुल्क निश्चित करते.खरेदी विक्री करार करताना त्यामध्ये गरजेनुसार विविध नियम व अटी सामाविष्ट केल्या जातात.पण गेल्या वर्षभरात उरण तालुक्यातील काही मौजे महसूला मध्ये शेतजमीन मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होत आहेत.शेतजमीन विक्री होत असताना सामनेवाला खरेदी करणारा हा शेतकरी असला पाहिजे.त्याच प्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अटी शर्तींचे पालन करून शासनाची बिगर शेतकरी असल्यास दंड आकारणे अशा प्रोसेस कराव्या लागतात.परंतु सध्या राजस्थान,मध्य प्रदेश येथील खोटे शेतकरी असल्याचे दाखले तयार करून एडिटींग करून जोडले जात आहेत.

सदर दाखल्यांची तपासणी केली असता राजस्थान साईट वरील भूमी प्रमाणपत्रक जोडून दस्त नोंदणी घातल्या जात आहेत. परंतु सदर जिल्हातील जमिन ह्या वाळवंटा मधील असून त्या शेतजमीनी नसून बंजर ओसाड आहेत.त्या जमिनीचा कोणत्याही प्रकारचा सातबारा नसतो.सदर जोडणारे दाखले हे त्याची कोणत्याही प्रकारची छाननी न करता खरेदी विक्रीचे रजिस्ट्रेशन आपल्या कार्यालयातून मोठ्या प्रमाणात होत आहेत.शिवाय बाजार मूल्यांकनापेक्षा कमी दरामध्ये जमिनीचे खरेदी विक्री दस्त होत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या महसूल खात्याचे आतापर्यंत कोट्यावधी रूपयाचे नुकसान झाले आहे.

तरी सदर संबधित दस्ताची संपूर्ण सखोल पडताळणी करून बोगस जोडलेल्या भूमी प्रमाणपत्राची सत्यप्रत आहे का याची पडताळणी व्हावी.तसेच महाराष्ट्र शासन राज्य पत्रक असाधारण भाग चार जोडून होणारे खरेदी नोंदनी दस्त थांबवावे कारण अशा जमिनीचा अधिकार अभिलेखात अशा शर्तींचे योग्य त्या पध्दतीने नोंद घालत नाहीत.तरी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने दस्त नोंद खरेदी या शासनाच्या नियम अटीनुसार होत नसेल तर आम्ही कायदेशीर मार्गाने हाय कोर्टामध्ये जनहीतार्थ याचिका दाखल करू याची नोंद घ्यावी अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनाने मा.दुय्यम निबंधक श्रेणी १ जेएनपीटी वसाहत शॉपिंग सेंटर उरण कार्यालयाला देऊन आपला रोष प्रगट केला.यावेळी नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकुर,तालुका अध्यक्ष ॲड.सत्यवान भगत,तालुका सचिव अपेक्ष कडू,मा.उपसरपंच पिरकोन दिपक पाटील, जनहीत कक्ष उरण तालुकाध्यक्षा मालती म्हात्रे,द्रोणागिरी शहर अध्यक्ष रितेश पाटील,नविन शेवा अध्यक्ष भालचंद्र म्हात्रे,नवघर उपविभाग अध्यक्ष हेंमत बंडा,वाहतुक विधानसभा अध्यक्ष साईराज माळी,मोठी जुई शाखा अध्यक्ष हर्षल भोपी,महासचिव जितेंद्र पाटील यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# “कलेतून स्वप्नांना पंख : शालवी दंडेचा संघर्ष ते यशाचा प्रवास”

**आसाराम विरकर**
**, संपादक, मराठवाडा आवृत्ती**
कला ही व्यक्तिमत्त्वाचा आरसा असते आणि तीच एखाद्याच्या जीवनाची दिशा ठरवू शकते. शालवी दंडे या तरुणीची कथा त्याचेच जिवंत उदाहरण आहे. आत्मविश्वास, मेहनत आणि जिद्द यांच्या बळावर तिने आपल्या कलेच्या जोरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.
शालवीला लहानपणापासूनच चित्रकला आणि हस्तकलेची आवड होती. सातत्यपूर्ण सराव, सर्जनशील प्रयोग आणि कल्पनाशक्तीच्या आधारे तिने आपली कला खुलवत नेली. तिच्या कलाकृती समाजाच्या नजरेत येऊ लागल्या आणि तिच्या मेहनतीचे रूपांतर यशात झाले.
सर्वात महत्त्वाचे म्हणजे शालवीने आयुष्यातील मोठ्या संघर्षांवर मात करत हा प्रवास करत आहे. गंभीर आजाराशी लढा देत असतानाही सदैव हसमुख चेहऱ्याने ती आपले जीवन जगत आहे आणि आपल्या कला गुणांनी आदर्श निर्माण करत आहे. तिच्या या वृत्तीने आणि कामगिरीने तरुणाईला खरी प्रेरणा दिली आहे.
"युवावाणी" या कार्यक्रमात सहभागी होताना शालवीने ठामपणे सांगितले : “यश सहज मिळत नाही, त्यासाठी विश्वास, जिद्द आणि सातत्याची मेहनत आवश्यक आहे. अडथळे आलेच तर त्यांच्यावर मात करून पुढे जायचे.” तिच्या शब्दांप्रमाणेच तिचा प्रवास संघर्षातून यशाकडे नेणारा आहे.
शालवीच्या कलेने केवळ तिच्या स्वप्नांना




आकार दिला नाही, तर समाजातील अनेक तरुणांना आत्मविश्वासाने उभं राहण्याची प्रेरणाही दिली आहे. तिच्या हाताने तयार झालेल्या हस्तकलेच्या वस्तू केवळ कलात्मक नाहीत, तर तिच्या चिकाटीचा आणि आनंदी वृत्तीचा सुगंध बाळगतात.
शालवी दंडेची कहाणी ही प्रत्येक तरुण–तरुणीसाठी एक प्रेरणादायी धडा आहे. गंभीर आजाराशी लढत असताना देखील हसतमुख राहून आणि कलेच्या माध्यमातून आयुष्याला अर्थ देत ती समाजासमोर एक उज्ज्वल आदर्श ठेवल्या जात आहे.

# हैदराबाद गॅझेटियर नुसार बंजारा समाजाला एस.टी.प्रवर्गाचे आरक्षण द्यावे - गोरसेना

**दैनिक युवक आधार**
**जळगाव आनंद पवार**
*मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅजेट नुसार आरक्षण लागू होते त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा हैदराबाद गॅजेट लागू करून एसटी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना जळगावचे जिल्हाधिकारी डॉ. आयुष प्रसाद यांच्यामार्फत केली आहे*
निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा,लंबाडा, लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्रप्रदेशातील बंजारा, लंबाडा जातीना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे. मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडा सह




विदर्भ खानदेशचा भाग महाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळ रहिवासी असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षण संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एसटी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे. मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एसटी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे.

जळगाव जिल्हाधिकारी यांना गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात आज दि. १० सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले. त्यामध्ये असे नमूद केले आहे की,महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाजवळ १९५० अगोदर अनुसुचित जमातीचे दुर्मिळ पुरावे असून क्रिमीनल ट्राईब कायद्याने बाधीत असूनही सेंट्रल प्रोवीन्स व बेरार प्रांतामध्ये तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्थान दिलेले होते.मात्र भाषावार प्रांतरचना, राज्य पुनर्चना कायद्याचा फटका महाराष्ट्रातील गोरबंजारा लमाण लंबाडी यांना बसला असून मुळ आरक्षणाला मुकावे लागले आहे. यासाठी गोरबंजारा समाजाने सातत्याने संघर्ष पुकारला असून त्यांना न्याय देण्यासाठी बापट आयोग,इधाते आयोग,भाटीया आयोग डि एन टी / एस टी आयोगाने महाराष्ट्रातील गोरबंजारा हा अनुसुचित जमातीचे आरक्षणाबाबत सकारात्मक शिफारशी करुनही त्यांना ते आरक्षण देण्यात आलेले नाही.डोंगर दऱ्यात राहणारा समाज आजही आदीम समुदायाची सर्व पात्रता पूर्ण करतो कारण स्वतंत्र बोली, भाषा,पेहराव, धाटीपरपंरा, स्वतंत्र तांडावस्ती,खानपान, स्वतंत्र असूनही त्यांना एस.टी.आरक्षणा पासून जाणीवपूर्वक टाळले जात आहे. अनुसूचित जमातीचे आरक्षणाबाबत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, राष्ट्रसंत रामराव महाराज सह अन्य समाजसुधारकांनी सातत्याने प्रयत्न केले असून - गोरसेना या बंजारा समाजातील अग्रगण्य संघटनेने गेल्या विस वर्षापासून मोर्चा आंदोलने केलेली आहेत. मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण लागू होते. त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा तेच गॅझेट लागू करुन एस टी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी डॉ आयुष प्रसाद यांच्या मार्फत केलेली आहे.
यावेळी गोर सेना तसेच सकल बंजारा समाजाकडून जळगाव येथील जी एस ग्राउंड ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत मुक मोर्चा काढण्यात आला असून यावेळी संपूर्ण बंजारा समाजातील सामाजिक संघटना व पदाधिकारी यांनी आपला सहभाग नोंदवला तसेच गोर सेनेच्या वतीने जळगाव जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग लगत भव्य असा संत सेवालाल महाराज यांचा पुतळा उभारावा अशी ही मागणी करण्यात आली आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# उदगिरात मोकाट कुत्र्याचा जीवघेणा हल्ला एकाचा जबडाच फाडला

## भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे शहरी नागरिक भयभीत

**दैनिक युवक आधार**
**उदगीर तालुका प्रतिनिधी  बालाजी तेलंगे**
विविध भागात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. मंगळवारी (दि.९) रात्री ९.३० वाजेच्या सुमारास चौबारा परिसरात एका ३६ वर्षीय तरुणावर मोकाट कुत्र्याने जीवघेणा हल्ला केला. यात तरुण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

मंगळवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास चौबारा परिसरात विजय चंद्रकांत वडजे यांच्यावर एका भटक्या श्वानाने जोरदार हल्ला केला. वडजे या तरुणाच्या तोंडाला चावा घेऊन गंभीर जखमी केले आहे. त्यांच्यावर उदगीरच्या शासकीय सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शहरातील विविध भागांमध्ये मोकाट

कुत्र्यांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे. अशा मोकाट कुत्र्यांचे टोळके अचानक जवळ येऊन नागरिकांना चावा घेत आहेत. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी व सायंकाळी व्यायाम, कामासाठी किंवा शाळेत जाणाऱ्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना या मोकाट कुत्र्यांपासून सावधवावरावे लागत आहे.

उदगीर शहरात मागच्या काही दिवसांपासून मुख्य रस्ते, बाजारपेठा, डम्पिंग ग्राउंड, रेल्वे स्थानक, मंदिर परिसर, शाळा-महाविद्यालये अशा विविध भागात कुत्र्यांच्या टोळ्या फिरताना दिसत आहेत. रात्री उशिरा बाहेर असलेल्या नागरिकांना श्वान लक्ष्य करीत आहेत.

पालिकेने बंदोबस्त करण्याची मागणी

शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. ते चावा घेत आहेत. यामुळे नागरिक त्रस्त आहेत, नगरपालिकेने मोकाट कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रेम तोगरे यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.




# मंगळवारी १६ सप्टेंबरला टिळक भवनमध्ये कॉंग्रेसचा रोजगार मेळावा.

## 40 पेक्षा जास्त नामांकित कंपन्या सहभागी होणार, बेरोजगार तरुणांसाठी मोठी संधी.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,** राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढलेली असून शिक्षण असूनही रोजगार मिळत नाही अशी परिस्थिती आहे. सरकार नोकर भरती करत नसल्याने लाखो पात्र मुले-मुली रोजगारापासून वंचित आहेत. तरुणांच्या हाताला काम मिळावे या भूमिकेतून कॉंग्रेस पक्षाने पुढाकार घेतला असून मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी कॉंग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवन येथे भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागातर्फे आयोजित या रोजगार मेळाव्यात आयटी, बँकिंग, रिटेल, हेल्थकेअर, मॅन्युफॅक्चरिंग, सर्व्हिसेस अशा विविध क्षेत्रांतील ४० पेक्षा जास्त नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या माध्यमातून तरुणांना शेकडो नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेषतः मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यातील इयत्ता ८ वी पासपासून उच्च शिक्षित गरीब व मध्यम वर्गीय तरुणांसाठी ही विशेष संधी आहे. बेरोजगार तरुणांनी https://forms.gle/1Y7mScKgSAc-9tY1E8 या लिंकवर क्लिक करून नोंदणी करावी व या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीतर्फे करण्यात आले आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकाची बँकेत हरवलेली रक्कम केली परत

## संतोष आगे यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड** :- सेवानिवृत्त शिक्षकाचे निवृत्त वेतनाचे ३५ हजार रुपये बँकेत खाली पडलेल्या अवस्थेत सापडल्यानंतर ते प्रामाणिकपणे बँक व्यवस्थापनाकडे परत करून संबंधितांकडे सुपूर्द करण्यात मदत करणाऱ्या तरुणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.संतोष प्रभाकर आगे म्हसोबा गल्ली सिल्लोड असे या तरुणाचे नाव आहे.

शहरातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत बोरगाव अर्ज तालुका फुलंब्री येथील सेवानिवृत्त शिक्षक गणपत भाऊराव बलांडे हे दर महिन्याप्रमाणे निवृत्त वेतन काढण्यासाठी गेले असता जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेतून ३५ हजार रुपये,बँक पासबुक खिशात ठेवत असताना पैसे खाली पडले ते पैसे संतोष आगे या तरुणास मिळाले असता त्याने बँक व्यवस्थापक शैलेश राजपूत यांना विचारणा केली त्यांनी लगेचच माहिती घेऊन हे पैसे बलांडे यांचे असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांच्याशी तातडीने संपर्क साधला व बलांडे यांना सदर रक्कम परत





करून संतोष आगे याचे अभिनंदन केले. संतोष आगे व बँक व्यवस्थापनाचे आभार मानत बलांडे यांना गहिवरून आले.त्यांचे डोळे पाणावले , यावेळी बँक व्यवस्थापक शैलेश राजपूत,रोखपाल भाऊसाहेब भोसले, एस.वाय.डकले, एन. डी.सोनवणे, श्रीमती यशस्वी जगताप यांचे सह अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

या घटनाक्रमांनी दररोजच्या अस्थिरतेच्या युगात आजही प्रामाणिक व्यक्ती आहेत हे सिद्ध झाले. संतोष आगे हा सहकार क्षेत्रामध्ये कार्यरत असून त्याचे वडील सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यात कर्मचारी होते वडिलापासून काही गोष्टी शिकून बँकिंग क्षेत्रामध्ये काम करताना प्रामाणिकपणा कायम ठेवत आजच्या घटनाक्रमाने त्याने त्याची पावती सर्वांना दिली आहे.या घटनेने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संतोष झोळ यांचा वाढदिवस श्री समर्थ संत गाडगे बाबा वृध्द धाम या आश्रमात अन्नदान करुन साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज);**
आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सअप ग्रुपच्या अंतर्गत २८ वा सामाजिक उपक्रम १० सप्टेंबर २०२५ रोजी ग्रुपचे सदस्य संतोष झोळ यांनी त्यांच्या ४४ व्या वाढदिवसा निमित्त आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या ग्रुपच्या अंतर्गत जिल्हा रायगड,तालुका अलिबाग,मुक्काम परहुर या गावातील श्री समर्थ संत गाडगे बाबा वृध्द धाम या आश्रमात एक वेळचे अन्नदान अर्पण करून आपला वाढदिवस साजरा केला.सामाजिक कार्याची आवड असलेले संतोष झोळ हे दरवर्षी आपल्या वाढदिवसा निमित्त काही ना काही अनाथ आश्रमास मदत करत असतात,या वर्षी हा सामाजिक कार्यक्रम झोळ यांनी आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या ग्रुप अंतर्गत ग्रुपचे सदस्य,संस्थापक,संचालक संतोष पाटील-विरार,सेक्रेटरी लवेश म्हात्रे- उरण,उपसेक्रेटरी भालचंद्र उकिर्डे-कुर्ला,कार्यालय प्रमुख रंजीत नरवणकर-चेंबूर,सल्लागार लिलाधर भोईर-पनवेल,मंगेश कवळे-अलिबाग तसेच संतोष झोळ यांचे संपूर्ण कुटुंब यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.



# शेतकरी कामगार पक्षाच्या माजी नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या प्रयत्नातून भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
पनवेल तालुक्यातील तोंडरे खालचा पाढा येथे शेतकरी कामगार पक्षाच्या माजी नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या प्रयत्नातून तसेच शेकाप, महाविकास आघाडी, मनसे व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. गॅलेक्सी कंपनीचे  आदर्श नायर सर यांचे सपोर्ट ,साद फाउंडेशनच्या विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले असून नायर हॉस्पिटलमध्ये रुग्णांचे मोफत उपचार केले जाणार आहेत.

या शिबिरामध्ये नागरिकांसाठी मोफत डोळे तपासणी, चष्म्यांचे वाटप, मोतीबिंदू तपासणी तसेच डोळ्यांच्या आजारांवर मोफत उपचारांची सोय करण्यात आली होती. शिबिराचे उद्घाटन हनुमान मंदिर येथे श्री हनुमान मूर्तीला माजी नगरसेवक




अरविंद म्हात्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. त्यानंतर माजी नगरसेविका उज्वला पाटील आणि विजय पाटील यांच्या हस्ते अगरबत्ती लावून व शिरफळ फोडून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

यावेळी माजी नगरसेविका उज्वला पाटील, माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे, समाजसेवक तथा शेकाप पुरोगामी युवक संघटना रायगड जिल्हा उपाध्यक्ष विजय पाटील, विश्वनाथ पाटील (मनसे विभाग अध्यक्ष), हरीश पाटील (शिवसेना तलोजा शहर उपाध्यक्ष), मानव अधिकार संघटना पनवेल तालुका अध्यक्ष महेश पाटील, मनोहर गंधारकर, शेकाप प्रभाग अध्यक्ष गोमेश पाटील, प्रभाग महिला अध्यक्ष रेखा पाटील, प्रभाग कार्याध्यक्ष गुरुनाथ पाटील, शेकाप सांस्कृतिक सेल उपाध्यक्ष विनायक पाटील, युवा कार्यकर्ता अशोक पाटील, कामगार संघटना उपाध्यक्ष बाळाराम पाटील, आपत्कालीन उपाध्यक्ष अरुण पाटील, प्रभाग उपाध्यक्ष नंदू पाटील, ग्रामपंचायत सदस्य गोटीराम पाटील, माजी सरपंच बेंदर पाटील व क्रीडा अध्यक्ष योगेश म्हात्रे यांची उपस्थिती होती.

या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेऊन नेत्र तपासणीचा लाभ घेतला. या उपक्रमामुळे माजी नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या कार्याचे परिसरात मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

# अपना बाजारचे माजी संचालक विश्वनाथ मलुष्टे यांचे दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**
**पाचलः-(प्रमोद तरळ)**
अपना बाजार या संस्थेचे माजी एक्झिक्युटिव्ह संचालक, जनता केंद्र ताडदेव या संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ मलुष्टे यांचे शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी अचानकपणे वयाच्या ७२ वर्षी निधन झाले. त्यांचे वडील महादेव शिवराम मलुष्टे ( येळवण) हे राजापूर तालुक्यांतील समाजवादी विचाराचे कार्यकर्ते व स्वातंत्र्य सैनिक होते. विश्वनाथ यांचे ११ वी पर्यंतचे शिक्षण सरस्वती विद्यामंदीर पाचल या शाळेत झाले. महाविद्यालयीन शिक्षण मुंबई मधील भवन्स कॉलेजमधे झाले. लॉं कॉलेज मधुन त्यांनी एलएलबी केले. कॉलेज शिक्षण नोकरी



करत पुर्ण केले. गौरी -गणपती विसर्जना नंतर येळवण गांवातून कुडाळ जवळील माणगांव येथे बहीणीकडे सर्व कुंटुंबीय गेले होते. तेथे त्यांनी अखेरचे श्वास शांतपणे घेतले. त्यांनी राष्ट्र सेवा दलाशी जोडून काम केले. समाजवाद्यांच्या चळवळीत काम करत राहीले. विक्रीकर विभागातून निवृत्त झाल्यावर जनता केंद्र आणि अपना बाजार मुंबई संस्थेमध्ये काम करत होते. वडीलांची विचार धारा विश्वनाथ आणि त्यांच्या भाऊ-बहीणीनी सोडलेली नाही. पुढे नेली. गड्या आपुला गांव बरा, ही भावना विश्वनाथ यांच्यांत प्रबळ होती.

# शिक्षक दिनानिमित्त जनजागृती सेवा संस्था, ठाणे मार्फत खारेपाटण ज्युनिअर कॉलेजमधील प्राध्यापकांचा सत्कार समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**खारेपाटण प्रतिनिधी -गुरुनाथ तिरपणकर**
)५सप्टेंबर हा दिवस भारताचे दुसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन, सर्वत्र शिक्षकदिन म्हणून साजरा केला जातो त्याच अनुषंगाने शिक्षक दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्था (रजि),ठाणे या सामाजिक संस्थेच्यावतीने 5 सप्टेंबर या शिक्षक दिनानिमित्त उद्योगश्री. प्र. ल.पाटील ज्युनियर कॉलेज, खारेपाटण, तालुका कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग येथील प्राध्यापकांचा शाल, भेटवस्तू,सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जनजागृती सेवा संस्था, ठाणे चे संस्थापक अध्यक्ष श्री. गुरुनाथ तिरपणकर, खजिनदार मा. श्री. दत्ता कडूलकर, सेवानिवृत्त माजी शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती









राजापूर शिक्षण विभाग, माजी उपाध्यक्ष रत्नागिरी प्राथमिक शिक्षक पतपेढीचे श्री. भास्कर गुरसाळे, कलादिग्दर्शक,गायक, संगीतकार, निवेदक श्री. शशिकांत कांबळी उपस्थित होते.तसेच खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री.प्रविण लोकरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा आपल्या मनोगतातून व्यक्त केला. 2021 स्थापन झालेल्या या संस्थेच्या माध्यमातून विविध शैक्षणिक सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. विविध सेवाभावी संस्थांना आर्थिक मदतीचा हात नेहमीच या संस्थेच्या माध्यमातून दिला जातो. कोरोना काळात गरजू कुटुंबांना आर्थिक मदतीचा हात जनजागृती सेवा मंडळ मार्फत देण्यात आला. संस्थेच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या सत्कार समारंभामध्ये ज्युनिअर कॉलेज खारेपाटण चे प्राचार्य श्री संजय सानप, पर्यवेक्षक श्री संतोष राऊत, सहाय्यक शिक्षक श्री अजय गुरसाळे, श्री दयानंद कोकाटे, श्री अंकुश नाईक,श्री संगाप्पा गुरव, श्री सुरेश करांडे, श्री रामचंद्र लोके, श्री नितीन वरुणकर, श्री भोलेनाथ कानागल, श्री सुबोध देसाई, श्री दिगंबर गुरखे, श्रीमती दीक्षा गुरखे, श्रीमती सारिका महिंद्रे, श्रीमती तबसूम काझी,
श्रीमती दर्शना पाताडे, कु. गौरी सारंगे कु. श्रुतिका जांभेकर कु. सायली पालव आणि सेट परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन केल्याबद्दल श्री. ऋषिकेश सानप यांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रवीण लोकरे उपाध्यक्ष श्री. भाऊ राणे सचिव श्री. महेश कोळसुलकर, संचालक श्री. विजय देसाई सिनिअर कॉलेज प्राचार्य श्री. कांबळे सर प्रशालेचे प्राचार्य श्री. संजय सानप पर्यवेक्षक श्री. संतोष राऊत सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. जनजागृती सेवा संस्थेच्या अभिनव उपक्रमाबद्दल खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री प्रवीण लोकरे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. श्री.अजय गुरसाळे यांनी केले. आणि आभार प्रदर्शन संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांनी केले.

# खिडकाळी गावातील भूमिहीन झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आले कार्यसम्राट खासदार डॉ. श्रीकांत शिंदे.

**दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत(कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)**
गेली अनेक महिने खिडकाळी गावातील शेतकरी त्रस्त होते. खिडकाळी गावातील ३०० एकर जमिनीवर education hub चे आरक्षण पडले होते. या कारणाने खिडकाळी गावातील शेतकरी भूमिहीन होणार या भीतीने चिंताग्रस्त झाले होते. यासाठी खिडकाळी गावातील शेतकऱ्यांनी अनेकवेळा मिटींग घेतल्या,लोकप्रतिनिधींना भेटून सदर विषयासंदर्भात पत्रव्यवहार व चर्चा ही केल्या. तसेच स्थानिक आमदार राजेश मोरे साहेब यांनी देखील गावात येऊन ग्रामस्थांची मिटिंग घेऊन मार्ग काढू असे सांगितले होते. यासंदर्भात आपण खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांनाही पत्र देऊन चर्चा केली असता त्यांनी त्वरित सबंधित अधिकारी यांना सूचना केल्या व शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मदत करण्यास सांगितले होते. त्याचाच परिणाम आज तेथील ७०% भूखंड आरक्षणातून वगळून रहिवासी झोन घोषित करण्यात आले आहे. खिडकाळी शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची गोष्ट आहे. म्हणून सन्मानीय खासदार डॉ.श्रीकांत शिंदे



साहेब व यासाठी मेहनत करणाऱ्या गावातील तरुणांचे (खिडकाळी जमीन आरक्षण संघर्ष समिती) ,ग्रामस्थ मंडळ खिडकाळीच्या वतीने मनपूर्वक आभार व्यक्त केले.

# करडा येथील तलाव धोकादायक स्थितीत,गावकऱ्यांची पुनर्वसनाची मागणी

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, मुख्यमंत्र्यासहित मंत्री महोदयाचे घेणार भेट

दैनिक युवक आधार
**तालुका प्रतिनिधी. रणजीत...ठाकूर**
**रिसोड-** करडा येथील तलाव धोकादायक स्थितीत असून पाण्याचा प्रवाह हा शंभर टक्के गावाकडे असून मोठ्या प्रमाणात जीवित्वाची हानी होण्याची शक्यता असल्याने गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी करणार गावकरी मंडळींनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली.
करडा येथील तलावाची परिस्थिती अतिशय धोकादायक बनली असून तलावाची निर्मिती ही तीस वर्षांपूर्वी झालेली आहे भिंतीची उंची जीर्ण होत ही मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे. मागील तीस वर्षात भिंतीवरती मोठ्या प्रमाणात झाडे उगवली असून त्याचे रूपांतर आता मोठ्या वृक्षात झाले आहे त्याची खोडं आणि मूळ ही एवढी खोलवर रुजलेली आहेत की त्यामुळे संरक्षण भिंती ह्या खिळाखीळ झाल्या आहेत. सोबतच जमीन पोखरणारे सायाळ,खेकडे या मुळे मोठ्या प्रमाणात जवळपास वीस वीस फुटाचे नळे पडले असून त्याद्वारे पाण्याचा विसर्ग मागील पाच वर्षापासून सुरू आहे. यासंदर्भात वेळोवेळी वृत्तपत्रात बातम्याही प्रसिद्ध झाल्या होत्या. काही वेळा थातूरमातूर वृक्ष छाटणी केले गेले परंतु खोलवर रुजलेली मूळ आणि खोडं यामुळे संरक्षण भिंत ही मोठ्या प्रमाणात पोखरल्या गेल्या असून त्यामधून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तसेच मागील तीस वर्षापासून दरवर्षी तलावातून



माती आणि इतर उपसा झाल्याने पाण्याची क्षमता ही तीन पटीने अधिक वाढलेली असून तलावामध्ये मर्यादेपेक्षा अधिक पाण्याचा साठा वाढला आहे. ही परिस्थिती बघता आणि संरक्षण भिंतीपासून गाव हे अवघ्या २०० मीटरच्या आतच असून तलावाच्या संरक्षण भिंतीची वाढलेल्या पाणीसाठ्याची धोकादायक परिस्थिती बघता काही घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात संपूर्ण गावात जीवित हानी होऊ शकते. तलावाची परिस्थिती बघता संरक्षण भिंतही गावाच्या अवघ्या २०० मीटर वर तर आहेच परंतु तलावाची उंची बघता गाव तलावाच्या सपाटीपासून १२ फूट खाली आहे आणि पाण्याच्या मर्यादेपासून तब्बल अंदाजे ६५ फूट खाली आहे त्यामुळे हा धोका अधिकच असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे करडा गावकरी यांच्या वतीने पुनर्वसनाची मागणी होत आहे. तलावाची एकंदरीत परिस्थिती बघता पुनर्वसनाशिवाय कोणताही पर्याय सध्या तरी दिसत नाही आणि ते लवकरात लवकर होणे गरजेचे आहे अन्यथा दुर्दैवाने एखादी घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होऊ शकते. यासाठी करडा गावकऱ्यांनी अनंतरावजी देशमुख माजी मंत्री यांच्याकडे ही परिस्थिती मांडली त्यांच्या मार्गदर्शनात ज्येष्ठ युवक ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेतली आणि त्यांना पुनर्वसनासाठी निवेदन दिले सोबतच जिल्हा जलसंधारण अभियंता यांना सुद्धा निवेदन देण्यात आले या संदर्भात करडा गावच्या तलावाची धोकादायक परिस्थिती बघता माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे गावाच्या पुनर्वसनासाठी पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री अनंतराव देशमुख यांनी करडा गावकऱ्यांशी चर्चा दरम्यान केली. एकंदरीतच करडा गावचे पुनर्वसन हाच एकमेव पर्याय असून त्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू होणे गरजेचे आहे अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडवून मोठ्या प्रमाणात जीवित हानी होऊ शकते अशी मागणी करडा गावकऱ्यांच्या वतीने होत आहे

---

# पनवेलमध्ये एआयचा प्रसार – आमदार प्रशांत ठाकूर यांचे ध्येय;

## एमकेसीएल प्रादेशिक बैठकीत नव्या संकल्पांचा उच्चार



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) आयोजित प्रादेशिक बैठक पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत राज्यातील सुमारे २०० केंद्रांचे एएलसी समन्वयक सहभागी झाले होते. विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण, अनुभवांची देवाणघेवाण तसेच आगामी योजनांवर सखोल चर्चा या बैठकीत करण्यात आली.
भविष्यात पनवेल परिसरात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) चा प्रसार वेगाने करण्याचे ध्येय आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवारी (दि. ११) झालेल्या या बैठकीच्या उद्घाटन सत्रात मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांनी आपल्या सादरीकरणातून एआयच्या मदतीने केंद्रांना नवनवीन संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांशी संवाद अधिक प्रभावीपणे साधण्यासाठी, मार्केटिंग अधिक स्मार्ट पद्धतीने राबवण्यासाठी तसेच व्यवसायवृद्धीसाठी एआयचा प्रभावी वापर करता येईल, असे त्यांनी सांगितले. बैठकीत शिक्षण, कौशल्यविकास आणि नवे तंत्रज्ञान यांमधील संधींवर भर देण्यात आला. दिवसभर चाललेल्या या चर्चासत्रांमुळे केंद्रांना भविष्यातील कामकाजाची दिशा लाभेल, असा विश्वास उपस्थित समन्वयकांनी व्यक्त केला. या प्रसंगी एएलसी समन्वयकांचा विशेष गौरव सत्कारही करण्यात आला.

---

# शिवसेना आपला दारी –बजरंग नगरात जनतेच्या ज्वलंत समस्या!

**दैनिक युवक आधार**
**नागपूर प्रतिनिधी**
मानेवाडा परिसरात "शिवसेना आपला दारी" हा उपक्रम जोमात सुरू आहे. वं. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेने, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविला जात आहे.
प्रभाग क्रमांक ३२ बजरंग नगरात झालेल्या बैठकीत स्थानिक नागरिकांच्या गंभीर समस्या मांडण्यात आल्या. शिवसेना सामाजिक कार्यकर्ते प्रेम (हितेश) मुंदाफळे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने मनपा हनुमान नगर झोन क्र. ३ चे सहआयुक्त नरेंद्र बावनकर यांना सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात असे नमूद करण्यात आले की,
बजरंग नगर, बौधिवृष नगर, कैलाश नगर, ज्ञानेश्वर नगर, सावित्रीबाई फुले नगर, विश्वकर्मा नगर, आदिवासी नगर, कौशल्य नगर, ताज नगर, वेळेकर लेआऊट व कुकडे ले आऊट या भागातील रस्त्यांची स्थिती अतिशय दयनीय आहे. गल्ली क्र.१ ते १७ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण न झाल्याने खड्डेमय



रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नाल्यांचे खोलीकरण व झाकणांची व्यवस्था नसल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून डास व जीवजंतुंची उत्पत्ती वाढतच आहे. नियमित साफसफाई होत नसल्याने केर कचऱ्याचे ढिगारे व दुर्गंधी चा त्रास नागरिकांना त्रासदायक ठरत आहेत.
बजरंग नगरातील उद्यानच गायब झाल्याने लहान मुलं व ज्येष्ठ नागरिक गार्डनपासून आज पर्यंत देखिल वंचितच आहेत.
दक्षिण नागपूरातील लोकांच्या आरोग्याला व सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असून त्वरित उपाययोजना न झाल्यास नागरिकांचा रोष उफाळून येईल, असा इशारा शिवसेना कार्यकर्त्यांनी दिला.
राहुल हेडाऊ, प्रवीण इंगोले, सोनू (साहिल) देठे, पंकज इटनकर, मुकेश भंडारी, प्रकाश काळे, श्रीकांत तराळे, अनिल वासनकर यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित हजर होते.
शिवसेनेच्या या उपक्रमामुळे स्थानिक जनतेच्या समस्या थेट समोर येत असून, त्या सोडविण्यासाठी दबाव निर्माण होत आहे. शिवसेना आपला दारी हा उपक्रम घरोघरी राबवित लोकांच्या समस्या जाणून घेत आहे सरकारने आता तरी जागे व्हा आणि ह्या सर्वसमस्याचे पालन करा अशी मागणी केली आहे.

---

# पालखेड विद्यालयात सामाजिक वनीकरणाचा 'एक विद्यार्थी,एक वृक्ष उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
पालखेड पंचक्रोशीत तसेच तालुक्यात विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक तथा सह शैक्षणिक उपक्रमांनी परिचित असलेल्या महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित,न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड येथे आज दि.१२ रोजी शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत 'एक विद्यार्थी एक वृक्ष' उपक्रम आयोजित करण्यात आला होता.
याप्रसंगी वन परिमंडळ अधिकारी एन.एन. गांगुर्डे म्हणाले की,"चंगळवाद,भोगवाद आणि भौतिक सुखवस्तूच्या मागे धावणारा माणूस सातत्याने स्वार्थी बनत आहे. मानवाच्या स्वार्थीपणामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून भविष्यात मानवासाठी धोकादायक आहे.आपण पर्यावरणाचे रक्षण केले तरच खऱ्या अर्थाने माणूस व सृष्टीची जीवसृष्टी सुखी आणि समाधानी होईल. पर्यावरणाचे आणि आपले रक्षण व्हावे यासाठी वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. भविष्यातील मानवापुढे धोके टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाढते प्रदूषण रोखून पर्यावरण रक्षण करणे आवश्यक आहे.त्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे" असे आवाहन केले. यावेळी सामाजिक वनीकरण



**पालखेडला 'एक विद्यार्थी,एक वृक्ष' उपक्रमांतर्गत उपस्थित एन.एन.गांगुर्डे,कल्पना पाईकराव,अशोक शेळके, निलेश गवांदे यांसह मान्यवर.**

शालेय इको क्लब,अमृत कुंभ अंतर्गत चिंच, आवळा,करंजी,आपटे,गुलमोहर,बहावा, कडू लिंब,आदी वृक्षांच्या रोपट्यांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण व वितरण करण्यात आले,
यानंतर मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी मनोगतातून वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला असून त्यामुळे ऑक्सिजन कमी होत आहे. आगामी काळात ऑक्सीजन वाढीसाठी जास्तीत जास्त वृक्ष लावण्याची गरज असल्याने सांगून वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे उपस्थितांना सांगितले.यावेळी वनरक्षक कल्पना पाईकराव, मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते.

---

# सोनेवाडी बु. येथील शेतकऱ्यांकडून अत्यवस्थ मोरास जीवदान

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**
:- काटेरी झुडुपात अडकून गंभीर जखमी झालेल्या आणि मोकाट कुत्र्यांच्या तावडीत सापडलेल्या मोरास सोनेवाडी बु. येथील शेतकऱ्यांनी जीवदान दिले आहे.
दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजताच्या सुमारास शेतकरी विजय सखाहरी निफाडे व गोरख सखाहरी निफाडे हे लोणजाई गडाच्या पायथ्याशी शेतात काम करत असताना त्यांना फडफड आवाज आला. त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता मोर काटेरी झुडुपात अडकून रक्तबंबाळ अवस्थेत तडफडत होता. याच ठिकाणी काही कुत्रे देखील शिकारीसाठी टपून बसले होते.
मात्र, मोर चावा घेतो का याची भीती असल्याने प्रथम धाकधूक वाटली. तरीही विजय निफाडे यांनी हळुवारपणे मोराला हातात घेतले. त्यानंतर दोन्ही शेतकऱ्यांनी मोरास काटेरी झुडुपातून सुखरूप बाहेर काढले. त्या क्षणी मोराने उडण्याचा प्रयत्न केला, पण तो जखमी असल्याने जवळच्याच खड्ड्यात पडला. लगेचच शेतकऱ्यांनी त्याला खड्ड्यातून काढत फडक्यात गुंडाळले व निफाड येथील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज कळस्कर यांच्याकडे नेऊन उपचारासाठी सुपूर्द केले. उपचारानंतर जखमी मोरास वनपाल विजय दोंदे यांच्या उपस्थितीत वनकर्मचाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले.



मोर हा हिंसक प्राणी नाही. त्यामुळे मोर किंवा इतर प्राणी संकटात असताना त्यांना मदत करून वनखात्यास कळवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. निफाडे बंधूंनी दाखवलेले धाडस व कर्तव्य प्रशंसनीय आहे.

**विजय दोंदे**
**वनपाल, निफाड**

---

# रेवदंड्यात सर्वधर्म समभावाचा अनोखा उत्सव – "रेवदंडाचा राजा" गणपती भाविकांच्या हृदयात विराजमान

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
रेवदंड्यात "रेवदंडाचा राजा" साखरचौथ गणपती उत्सवाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
अलिबाग तालुक्यातील ऐतिहासिक रेवदंडा गावाने पुन्हा एकदा भक्तिभाव, उत्साह आणि सांस्कृतिक परंपरांचा संगम अनुभवला. संकष्टी चतुर्थी (१० सप्टेंबर २०२५) निमित्त रेवदंड्यात "रेवदंडाचा राजा" म्हणून गणपती बाप्पाची मूर्ती मोठ्या जल्लोषात स्थापित करण्यात आली. मागील तेरा वर्षांपासून सतत साजरा होत असलेल्या या उत्सवाचे यंदा चौदावे वर्ष असून, दीड दिवसांचा हा गणेशोत्सव रेवदंड्यातील महत्त्वाचा सांस्कृतिक आणि धार्मिक सोहळा ठरतो. भैरवनाथ मंदिराजवळील रेवदंडा हायस्कूल शेजारी हा उत्सव नेहमीप्रमाणे थाटामाटात आयोजित करण्यात आला. गणेश मूर्तीचे आगमन, ढोल-ताशांच्या गजरात झालेली मिरवणूक, महिला मंडळींचे पारंपरिक वेशभूषेतले स्वागत, राजकीय व सामाजिक पाहुण्यांची उपस्थिती यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे सोने झाले.रेवदंड्यातील मित्र मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षे हा गणपती उत्सव सातत्याने साजरा केला जात आहे. विशेष म्हणजे, हा उत्सव सर्वधर्म समभावाचा द्योतक ठरतो. हिंदू-मुस्लिमांसह सर्व समाजाचे लोक एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात, हीच याची खरी वैशिष्ट्ये मानली जातात. सांस्कृतिक परंपरेचा ठसा उमटवत या उत्सवात भजन, कीर्तन, नृत्य-गायन, ढोल-ताशा, लेझीम अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. रेवदंड्याच्या रस्त्यांवर फुलांची उधळण, गजर करणारे ढोल, गणपतीच्या गजरात नाचणारे भाविक या साऱ्या दृश्यांनी गावात भक्ती आणि आनंदाचा माहोल अनुभवायला मिळतो.विसर्जनाच्या दिवशी "रेवदंडा राजाची" भव्य मिरवणूक काढण्यात येते. गावातील प्रत्येक कोपऱ्यातून भक्त भाविक सहभागी होतात. फुलांचा वर्षाव, पारंपरिक नृत्य, आणि "गणपती बाप्पा मोरया"च्या गजरात निघालेली मिरवणूक संपूर्ण रेवदंडा गावाला एकत्र आणते.रेवदंड्याचा हा गणेशोत्सव फक्त स्थानिकांच्याच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रभरातील भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. "रेवदंडाचा राजा" हा केवळ धार्मिक सोहळा नसून, तो कोकणातील सांस्कृतिक परंपरेचा आणि ऐक्यभावाचा जिवंत नमुना आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रेवदंड्यात सर्वधर्म समभावाचा अनोखा उत्सव – "रेवदंडाचा राजा" गणपती भाविकांच्या हृदयात विराजमान

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंड्यात "रेवदंडाचा राजा" साखरचौथ गणपती उत्सवाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




अलिबाग तालुक्यातील ऐतिहासिक रेवदंडा गावाने पुन्हा एकदा भक्तिभाव, उत्साह आणि सांस्कृतिक परंपरांचा संगम अनुभवला. संकष्टी चतुर्थी (१० सप्टेंबर २०२५) निमित्त रेवदंड्यात "रेवदंडाचा राजा" म्हणून गणपती बाप्पाची मूर्ती मोठ्या जल्लोषात स्थापित करण्यात आली. मागील तेरा वर्षांपासून सतत साजरा होत असलेल्या या उत्सवाचे यंदा चौदावे वर्ष असून, दीड दिवसांचा हा गणेशोत्सव रेवदंड्यातील महत्त्वाचा सांस्कृतिक आणि धार्मिक सोहळा ठरतो. भैरवनाथ मंदिराजवळील रेवदंडा हायस्कूल शेजारी हा उत्सव नेहमीप्रमाणे थाटामाटात आयोजित करण्यात आला. गणेश मूर्तीचे आगमन, ढोल-ताशांच्या गजरात झालेली मिरवणूक, महिला मंडळींचे पारंपरिक वेशभूषेतले स्वागत, राजकीय व सामाजिक पाहुण्यांची उपस्थिती यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे सोने झाले.रेवदंड्यातील मित्र मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षे हा गणपती उत्सव सातत्याने साजरा केला जात आहे. विशेष म्हणजे, हा उत्सव सर्वधर्म समभावाचा द्योतक ठरतो. हिंदू-मुस्लिमांसह सर्व समाजाचे लोक एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात, हीच याची खरी वैशिष्ट्ये मानली जातात. सांस्कृतिक परंपरेचा ठसा उमटवत या उत्सवात भजन, कीर्तन, नृत्य-गायन, ढोल-ताशा, लेझीम अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. रेवदंड्याच्या रस्त्यांवर फुलांची उधळण, गजर करणारे ढोल, गणपतीच्या गजरात नाचणारे भाविक या साऱ्या दृश्यांनी गावात भक्ती आणि आनंदाचा माहोल अनुभवायला मिळतो. विसर्जनाच्या दिवशी "रेवदंडा राजाची" भव्य मिरवणूक काढण्यात येते. गावातील प्रत्येक कोपऱ्यातून भक्त भाविक सहभागी होतात. फुलांचा वर्षाव, पारंपरिक नृत्य, आणि "गणपती बाप्पा मोरया"च्या गजरात निघालेली मिरवणूक संपूर्ण रेवदंडा गावाला एकत्र आणते. रेवदंड्याचा हा गणेशोत्सव फक्त स्थानिकांच्याच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रभरातील भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. "रेवदंडाचा राजा" हा केवळ धार्मिक सोहळा नसून, तो कोकणातील सांस्कृतिक परंपरेचा आणि ऐक्यभावाचा जिवंत नमुना आहे.

# बेलापूर न्यायालयात शनिवारी लोकअदालत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर रायगड**



नवी मुंबई : तालुका विधी सेवा समिती व अतिरिक्त सत्र न्यायालय, बेलापूर यांच्या वतीने शनिवारी, १३ सप्टेंबर २०२५ रोजी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये दिवाणी व फौजदारी वर्गातील किरकोळ प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रकरणे निकाली काढण्याचे आवाहन न्यायालयामार्फत करण्यात आले आहे.आपसातील वादातून किंवा व्यवहारातून दाखल होणाऱ्या किरकोळ गुन्ह्यांच्या खटल्यांचा भार न्यायालयावर वाढत आहे. त्यामुळे लोकअदालतीच्या माध्यमातून अशी किरकोळ प्रकरणे निकाली काढण्याचा प्रयत्न होत असतो.

त्यानुसार, शनिवारी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तालुका विधी सेवा समिती व अतिरिक्त सत्र न्यायालय, बेलापूर यांच्या वतीने ही लोकअदालत होणार आहे.

## गांधी महाविद्यालयाचा मुकाभिनय व प्रहसन युवा महोत्सवात उत्कृष्टपणे सादर

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

तालुक्यातील कडा शहरात असणारे अन् महाराष्ट्रभर नावाजलेले महाविद्यालय जैन संस्थेच्या अंतर्गत गांधी महाविद्यालय मोडत असुन विमानाने शैक्षणिक सहल घेऊन जाणारे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय ठरले आहे अन् वारंवार वेगवेगळ्या उपक्रमातुन नेहमीच हे महाविद्यालय सर्वसामान्यात चर्चेत येतं असतं असा एक उपक्रम म्हणजे गेवराई शहरात झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आयोजित बीड युवा महोत्सव 2025 यातून बी सी ए च्या विद्यार्थ्यांनी मोबाईल चा अतिवापर व त्यामुळे होणारे दुष्परिणाम तसेच प्रहसनातून रिल लाइफ मध्ये न जगता रिअल लाईफ मधे जगण्याचा संदेश प्रहसणातून दिला.

या कला प्रकारामध्ये बी सी ए विभागातील विद्यार्थी प्रिया पवळ(पत्रकार),रोशनी राजपूरे,कर्डीले वैष्णवी,थोरवे प्रतिक्षा,सय्यद निदा , मोहळकर वेदांती,पवार गणेश , अहेरकर ज्ञानेश्वर यांचा सहभाग होता

महाविद्यालयाचे प्राचार्य जे.एम भंडारी, बी सी ए विभाग प्रमुख प्रा.वाघूले व्हि. टी,प्रा.कोल्हे मॅडम,प्रा.बोदार्डे एस.एस व प्रा.पाताळे एस एस यांचे मार्गदर्शन लाभले.



# सिल्लोड शहरात अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, नागरिक त्रस्त, प्रशासन सुस्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- शहरातील मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. रस्त्यावर वाहनांना जागाच उरत नाही. त्यामुळे दररोज वादाचे प्रसंग घडत आहेत. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. नागरिक आणि वाहनधारक संतप्त आहेत. पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.



शहर पोलिस ठाण्याने १३३ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. ३२ ठिकाणी वाहतूक नियम तोडणाऱ्यांवर कारवाईसाठी हे कॅमेरे लावले आहेत. गुन्हेगारी आळा घालणे, चोरी कमी करणे, वाहतूक सुरळीत ठेवणे हा उद्देश आहे. मात्र मुख्य रस्त्यावर अतिक्रमणामुळे वाहनांना मार्गच उरत नाही. त्यामुळे कॅमेऱ्यांचा उपयोग होत नाही. शहरातील आंबेडकर चौक सर्वाधिक धोकादायक बनला आहे. मुख्य चौकांमध्ये वाहतूक नियमांचा फज्जा उडालेला आहे. वाहनधारक पोलिसांचीही पर्वा करत नाहीत. दिवसभर वाहने नियम तोडत असतात. छत्रपती संभाजीराजे चौक, महाराणा प्रताप चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, मौलाना आझाद चौक, अहिल्याबाई होळकर चौक या पाच प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडी रोजची झाली आहे.

या चौकांमधून भरधाव वेगाने जाणारी वाहने नागरिकांच्या जीवावर उठली आहेत. पोलिसांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत. भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे अपघात होत आहेत. अनेक निरपराध लोकांचे प्राण गेले आहेत. तरीही पोलिस प्रशासन गंभीर नाही. दुचाकीवर ट्रिपलसीट जाणारे युवक, लहान मुले भरधाव वेगाने मोटारसायकल चालवतात. कर्णकर्कश हॉर्न लावलेली वाहने त्रासदायक ठरत आहेत. अल्पवयीन मुले दुचाकी, रिक्षा, चारचाकी चालवत असल्याने मोठ्या अपघातांचा धोका वाढला आहे.

पोलिसांच्या दुर्लक्षामुळे अशा वाहनधारकांची हिंमत वाढली आहे. मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या दुकानांसमोर हजारो दुचाकी उभ्या असतात. त्यामुळे रस्ता अरुंद होतो. दिवसभर अपघात आणि वाद घडतात. तहसील कार्यालय वगळता इतर शासकीय कार्यालये, बँका, हॉस्पिटल्स यांच्याकडे वाहनतळ नाही. त्यामुळे नागरिक रस्त्यावरच वाहने उभी करतात. पोलिस यंत्रणा कारवाई करण्यात अपयशी ठरत आहे. कारवाई करणाऱ्या पोलिसांना वाहनधारकांचा रोष सहन करावा लागतो. त्यामुळे पोलिसही कारवाईस धजावत नाहीत. नागरिकांनी पोलीस आणि नगर परिषद प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे

## आष्टी येथील विमल कदम यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**



आष्टी शहरातील विमल रामभाऊ कदम वय८०यांचे बुधवार दि.१०सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचे पहाटे ४ वाजता निधन झाले त्यांच्या पार्थिवावर शेकापूर रोडवरील खंडोबा मंदिराजवळील स्मशानभूमीत सकाळी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी,सुना नातवंडे असा परिवार आहे.दिलीप कदम,प्रकाश कदम यांच्या त्या मातोश्री होत्या तर पत्रकार अविनाश कदम,बाबासाहेब कदम,कैलास कदम यांच्या चुलती होत्या आणि हरि कदम,किरण कदम,पवन कदम यांच्या आजी होत्या.

# पिंपळगाव ब. नगर परिषदेला दिले निवेदन- महात्मा रावण किंग फाउंडेशन

दैनिक : युवक आधार
/कृष्णा गायकवाड- पिंपळगाव बसवंत स्पीड ब्रेकर बसवणे कामी निर्भय महाराष्ट्र पार्टी व आदिवासी उलगुलान सेना यांचे नगर परिषदेला निवेदन*

पिंपळगाव बसवंत नगर परिषद परिसरातील निफाड रोड वीट भट्टी ते स्मशानभूमी दरम्यान स्पीड ब्रेकर टाकण्यात यावे.

सदर परिसरात वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते सद्यस्थितीत पिंपळगाव बसवंत येथे कृषी उत्पन्न बाजार समिती असल्याने सदरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहने ये - जा करत असतात त्याचप्रमाणे तीन चार लोक वस्त्या लगत असल्याने सदरील परिसरातील नागरिकांची लोकसंख्या किमान पाच - ते सहा हजाराच्या




आसपास आहे सदर ठिकाणी आत्ताच काही दिवसापूर्वी सायंकाळी एका धावत्या कार गाडीने दोन इसमांस अति वेगाने फरपटत नेले त्यात एका इसमाचा जागीच चिरडून मृत्यू झाला आहे.

तर दुसरा इसम कारच्या पुढील बंपरला अडकून साधारण तः 300 ते 400 फूट फरपटत नेऊन गंभीर जखमी झाला आहे हा अपघात इतका भयानक होता कि बघणाऱ्यांचा देखील थरकाप उडाला असे अपघात लक्षात घेता या रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांच्या गतीला आवर घालण्यासाठी व होणारे अपघात टाळण्यासाठी पिंपळगाव बसवंत नगर परिषद परिसरातील निफाड रोड वीटभट्टी ते स्मशानभूमी दरम्यान स्पीड ब्रेकर बसवणे अत्यंत गरजेचे आहे.

या कामी नगरपरिषद प्रशासनाने संबंधित विभागासोबत चर्चा करून व संबंधित विभागाला नगरपरिषद द्वारे पत्रक देऊन अपघात स्थळी स्पीड ब्रेकर बसवून देण्यात यावे अश्या प्रकारचे निवेदन पिंपळगाव बसवंत नगर परिषद अधिकारी मुरकुटे साहेब यांना देण्यात आले आहे याप्रसंगी महात्मा रावण किंग फाउंडेशन, आदिवासी उलगुलान सेना श्री दत्ताभाऊ झनकर व निर्भय महाराष्ट्र पार्टी , निफाड तालुका अध्यक्ष श्री संतोष भाऊ सुरवडकर यांनी विनंती केली आहे याप्रसंगी निर्भय महाराष्ट्र पार्टी पिंपळगाव बसवंत शहराध्यक्ष फारुख भाई शेख, संतोष बोरसे, संदीप ठाकरे,महेश शेवरे आदी उपस्थित होते.

# सणसर प्राथमिक शाळेतील विध्यार्थीनां मोफत पाणी बॉटल वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे बुधवार दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी ग्राम ऊर्जा फाऊंडेशन यांच्या वतीने आणि निर्माण बहुउद्देशीय विकास संस्था पुणे यांच्या माध्यमातून इंदापूर कार्यक्षेत्रातील सणसर या गावातील निर्माण संस्थेच्या माध्यमातून सुरू असणारे सावित्रीची शाळा व महिला सन्मान केंद्रातील कैकाडी वस्ती आणि वडारवस्तीतील मुला मुलींना पिण्याच्या पाण्याची बॉटल देण्यात आली.यावेळी मा सरपंच पार्थ निंबाळकर शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षण तज्ञ मा.दिनेश बापू निंबाळकर श्री छत्रपती हायस्कूलचे संभाजी भोईटे सर व निर्माण संस्था पुणे जिल्हा समन्वयक रवी पवार सर आणि निर्माण स्टाफ उपस्थित होते. सध्या मुलांच्या आरोग्यासाठी पाणी हा महत्वाचा घटक असून 80 टक्के लहान मुले पिण्याच्या पाणी व्यवस्थित नसल्याने आजरी पडत असतात तरी मुलांना शुद्ध आणि मुबलक पाणी मिळायला हवे या उद्देशाने तसेच मुले शाळेत जाताना पाण्याची प्लास्टिक बॉटल घेऊन जातात त्यामुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.प्लास्टिक हे आपल्या शरीरासोबत पृथ्वी साठी पण घातक असल्याने मिल्टन या कंपनीची बॉटल मुलांना देण्यात आली.या बॉटलमध्ये पाणी ज्या स्थितीत ठेवलं आहे त्या स्थितीत राहून पिण्यायोग्य पाणी मुलांना मिळेल ज्यात गरम आणि गार पाणी घेऊन विध्यार्थी जाऊ शकतात.




सणसर गावात कैकाडी आणि वडार समुदायाची वस्ती आहे.त्यातील एकूण ९५ मुले शिक्षण घेतात त्या सर्वांसाठी पाणी बॉटल उपलब्ध करून दिल्यामुळे मुलांसोबत त्यांच्या पालकांना पण आनंद झाल्याचे दिसून येत आहे. यावेळी महिला पालक व मुलांनी संस्थेचे आभार मानले.

# शिक्षक दिनानिमित्त मलकापूर येथे नॅशनल आयकॉन अवॉर्ड संपन्न

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

शिक्षक दिनानिमित्त आयोजित नॅशनल आयकॉन अवॉर्ड 2025 कार्यक्रम मलकापूर येथील भातृ मंडळ येथे आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला .

हिंदी मराठी पत्रकार संघ च्या वतीने शिक्षक दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी नॅशनल आयकॉन अवार्ड 2025 चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते



त्यावेळी 855 प्रस्तावांपैकी निवड करून 150 मान्यवरांना नॅशनल आयकॉन पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रात बहुमूल्य कार्य करणाऱ्या 110 शिक्षकांचा सुद्धा नॅशनल आयकॉन अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला.

नॅशनल आयकॉन अवार्ड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रा. अनिल खर्चे (प्राचार्य व्ही. बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज) तर प्रमुख पाहुणे भाई अशांत वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ, धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, बाळासाहेब दामोदर उद्योजक, अड सम्यक चवरे , दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजयकुमार डागा, दिलीप आढाव (प्राचार्य विद्या विकास विद्यालय ) सरिता पाटील (प्राचार्य प्राथमिक मराठी आमची शाळा), विद्या काळबांडे (प्राचार्य चांडक विद्यालय),डॉ. प्रदीप गायकी वाहतूक नियंत्रक नांदुरा **हे होते**

कार्यक्रमाची सुरुवात सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

**नॅशनल आयकॉन अवार्ड 2025 पुरस्कार प्राप्त वितरण**
**शैक्षणिक 43, सामाजिक**
27, पत्रकारिता 42, स्थानिक शिक्षक 86, आरोग्य 28, प्रशासकीय विभाग 2, साहित्य 3, कृषी 3, उद्योजक 2, पर्यावरण 2, सामाजिक संस्था 2, कला 7, वैद्यकीय 7 क्रीडा 6

कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक ,राजकीय ,कला, वैद्यकीय, वकील, उद्योजक अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार महाराष्ट्र नॅशनल आयकॉन 2025 देऊन करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी देशासाठी आपल्या प्राणाची परवा न करता देशसेवा करणाऱ्या माजी सैनिकांचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

महिलांसाठी मानाची असे समजले जाणारे आशा स्वयंसेविका कार्यरत असणाऱ्या महिला भगिनींचा सत्कार देखील या कार्यक्रमात करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र गंणगे सर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रकाश थाटे यांनी केले

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुधाकर तायडे, नथूजी हिवराळे, विनायक तळेकर, विजय भगत, मयूर लड्डा, आत्माराम मोरे, भाऊराव व्यवहारे ,राजू घाटे, अमोल वानखेडे, ऋषिकेश तेजेकर, मुकुंदा पाटील यांनी परिश्रम घेतले.

# युवक आधार

वर्ष : २ अंक : 358 शनिवार दि. 13 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6




# दैनिक युवक आधार वर्धापन दिना चा सोहळा उत्साहात साजरा









































